अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | बुधवार
२२.०७.२०२६

# वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १७२ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## बोगद्यात भूस्खलन, २० कामगारांचे मृतदेह सापडले

### ५ जण अजूनही अडकले : बोगदा मिथेन वायूने भरल्याने बचाव पथके सुद्धा बेशुद्ध पडली

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**सिक्कीम** – सिक्कीममधील एनएचपीसीच्या जलविद्युत प्रकल्पाच्या बोगद्यात अडकलेल्या २५ कामगारांपैकी २० जणांचे मृतदेह मंगळवारी रात्री उशिरा बाहेर काढण्यात आले. उर्वरित पाच कामगारांपर्यंत बचाव पथके रात्री उशिरापर्यंत पोहोचू शकली नाहीत. हे कामगार बोगद्यात वेगवेगळ्या ठिकाणी अडकले होते. त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी पथके २४ तास काम करत होती, परंतु बोगद्यात मिथेन वायू भरल्यामुळे अनेक बचाव पथके बेशुद्ध पडली. हा नामची जिल्ह्यातील समरदुंग-झोलुंगाय येथे बांधण्यात येत असलेल्या तीस्ता स्टेज-६ प्रकल्पाचा भाग असलेला आदित-३ बोगदा आहे. याचे बांधकाम पटेल इंजिनिअरिंग कंपनी करत होती. पाण्याचा वेगवान प्रवाह हाताळण्यासाठी दोन समांतर बोगदे बांधले जात आहेत. ते प्रत्येकी ५ किलोमीटर लांबीचे आहेत. हा अपघात फेज-४बी मध्ये झाला. हा बोगदा छतावरून पडणाऱ्या ढिगाऱ्याने आणि मिथेन वायूने ??भरलेला आहे. हा वायू ऑक्सिजन कमी करतो, ज्यामुळे श्वास घेणे अशक्य होते.

## शरद पवार-मोदी भेटीमुळे तर्कवितर्कांना उधाण

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



**मुंबई** – राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी बुधवारी संसदेतील पंतप्रधान कार्यालयात (पीएमओ) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. दिल्लीत 'नीट' पेपरफुटीविरोधात सुरू असलेले विद्यार्थ्यांचे आंदोलन आणि राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत ही भेट झाल्याचे सांगितले जात असले, तरी महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींची पार्श्वभूमी या भेटीला असल्याचे कळते संसदेतील पंतप्रधान कार्यालयात झालेल्या या भेटीची काही छायाचित्रे समोर आली असून, त्यामध्ये पंतप्रधान मोदी हे हसतमुखाने शरद पवार यांचे स्वागत करताना आणि गप्पा मारताना दिसत आहेत.

## हिवरखेडजवळ ऑटो-आयशरच्या भीषण अपघातात महिलेचा जागीच मृत्यू : ५ जण गंभीर जखमी

### बेलोरा येथे जात असलेल्या ऑटोला भरधाव आयशर ट्रकची जोरदार धडक

### ट्रक चालकासह वाहन पोलिसांच्या ताब्यात, मोर्शी पोलिसांचा तपास सुरु

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**मोर्शी** – तालुक्यातील हिवरखेड बसस्टॉपजवळ सोमवारी (दि.२१) सायंकाळी सुमारे ७ वाजताच्या सुमारास ऑटो रिक्षा आणि आयशर ट्रक यांच्यात झालेल्या भीषण समोरासमोरच्या अपघातात एका महिलेचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर पाच जण गंभीर जखमी झाले. जखमींना प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, मोर्शी तालुक्यातील तळणी येथून वरुड तालुक्यातील बेलोरा येथे जाणारी ऑटोरिक्षा (क्र. एमएच-२७ बीडब्ल्यू-८९५९) हिवरखेड बसस्टॉपजवळ पोहोचताच विरुद्ध दिशेने भरधाव येणाऱ्या आयशर ट्रकने (क्र.एमएच-२८ एबी-७०२०) जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की ऑटोचा चक्काचूर झाला. या अपघातात शितल रवींद्र ताथोडे (वय ३५, रा.बेलोरा, ता.वरुड) यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर ऑटोचालक इरफान सलीम पठाण (३०), आकाश शेषराव भलावी (३२), प्रज्वल मदन तिडके (२४) (सर्व रा.तळणी, ता.मोर्शी), तसेच श्लोक रवींद्र ताथोडे (१३) व आबाराव पुंडलिकराव ताथोडे (७८) (दोघे रा.बेलोरा, ता.वरुड) हे गंभीर जखमी झाले. सर्व जखमींना तातडीने अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी रवाना करण्यात आले.

अपघाताची माहिती मिळताच मोर्शी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघातग्रस्त आयशर ट्रक आणि चालकाला ताब्यात घेण्यात आले असून पो-लीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरु आहे. अपघातामुळे काही काळ परिसरात वाहतूक विस्कळीत झाली होती.




## कचऱ्याचे मोजमाप न करताच काढली कंत्राटदाराची कोटयवधींची देयके!

### नगरपरिषद अधिकारी व कर्मचारी गांधीरीच्या भुमिकेत : वजनकाटयाला चढला गंज

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*





**भाग -५**

**वरुड** – वरुड नगर परिषदेचा कारभार रामभरोसे सुरु आहे, असे म्हटले तर वावगे ठरु नये, गेल्या अनेक वर्षांपासून वरुड शहरातील कचरा गोळा करण्याची आणि त्यावर प्रक्रिया करण्याची जबाबदारी नागपूर येथील गिरीश काळे यांच्या मालकीच्या स्वप्नपुर्ती कंपनीकडे सोपविण्यात आली होती.

या कंपनीचा कंत्राट ३१ एप्रिल २०२६ रोजी संपली तरी त्याच कंपनीला मुदतवाढ देत नगरपरिषदेच्या पैशाचा गैरवापर सुरु आहे. वरुड नगर परिषद संबंधित कंत्राटदाराने वाहनांमार्फत गोळा केलेला कचरा मोजून त्या कचऱ्याच्या भारोभार ठरल्यानुसार देयक काढून देते परंतु संपूर्ण वरुड शहरातून कितीही प्रयत्न केला तरी ९ ते १० टनापेक्षा जास्तीचा कचरा निघू शकत नाही, हे सत्य असले तरी संबंधित कंत्राटदाराला २५ ते ३० टन कचऱ्याचे देयक आतापर्यंत दिल्या गेल्याचे माहितीच्या अधिकारात निष्पन्न झाले असून या प्रकरणात कोणाकोणाचे हात ओले झालेत? याचा तपास करुन संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी आता पुढे येऊ लागली आहे. विशेष म्हणजे शहरातून गोळा केलेला कचरा मोजुन त्यांची नोंद घेतल्या गेली पाहीजे परंतु या ठिकाणी लावण्यात आलेल्या वजनकाटयाला संपुर्ण गंज चढला असून त्याच्या सभोवलता एकाही वाहनाची चाकोली दिसुन येत नाही किंवा वजन मोजल्याबाबतचा एकही पुरावा तेथे आढळून आला नाही, त्यामुळे वजनकाटा हा शो पिस असुन कचऱ्याचे वजन अंदाजे टाकून केवळ नोंद घेवुन हे कंत्राटदार महोदय मोकळे होतात मात्र त्याचेवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी कोणाची? हा प्रश्न सुध्दा या निमित्ताने उभा ठाकला असून सबंधितांवर आता निलंबनाची कारवाही करुन या कंत्राटदाराकडून वसुली करण्याची मागणी सर्वसामान्यांकडून केल्या जात आहे. गेल्या अनेक वर्षांपासुन नागरिकांच्या पैशाचा अपव्यय सुरु असून याला जबाबदार कोण? त्याचा शोध घेण्याची गरज निर्माण झाली आहे. दुसरीकडे संकलीत केलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची जबाबदारी सुध्दा कंत्राटदाराची असतांना करण्यात येणारी प्रक्रिया केवळ कागदोपत्री असल्याचे दिसुन येत आहे.

'ऐकाव ते नवलच', आतापर्यंत नगरपरिषदेने कचरा संकलन करण्याच्या नावावर सबंधित कंत्राटदाराला कोटयवधी रुपये दिले खरे परंतु संपुर्ण शहरातून तो कचरा सकंलीत करुन संपुर्ण कचरा वाहनामार्फत कचरा डेपो पर्यंत नेण्याची ज्या कंत्राटदाराची आहे, त्या कंत्राटदाराने जमा केलेला कचरा मोजण्याची जबाबदारी कोणाची? हा प्रश्न मात्र अनुत्तरीत आहे. जमा केलेला कचरा टनाने मोजल्या जातो परंतु जर कंचरा डेपोवर जावुन बघितले असता या ठिकाणी कचरा मोजण्याकरीता वापरण्यात येणारा वजन काटयाला संपुर्ण गंज पकडला असुन गेल्या अनेक दिवसांपासुन त्या काटयाचा वापर करण्यात आला की नाही, याबाबत सुध्दा साशंकता आहे. कोणताही वजनकाटयाचे निरिक्षण केले असता त्या वजनकाटयाच्या सभोवताल वाहनांची चाकोली निदर्शनास येते मात्र कचरा डेपोवरील वजनकाटयावर मात्र एकाही वाहनाची चाकोली निदर्शनास आली नाही, त्यामुळे या ठिकाणी आणण्यात आलेल्या शेकडो टन कचरा कोणत्या वजनकाटयावर मोजण्यात आला आणि तो कशा पध्दतीने मोजण्यात आला, हे सुध्दा न उलगडणारे कोडे आहे. विशेष म्हणजे कंचऱ्याचे मोजमाप करीत असतांना त्या ठिकाणी नगरपरिषदेचा अधिकारी किंवा कर्मचारी उपस्थित असणे गरजेचे आहे परंतु त्या ठिकाणी कोणीही अधिकारी किंवा कर्मचारी निदर्शनास आले नाही, त्यामुळे घनकचरा व्यवस्थापनाच्या नावाखाली मोठे घबाड असल्याचे बोलल्या जात आहे.

संपूर्ण शहरातील कचरा गोळा केल्यानंतर त्यावर प्रक्रिया करण्याची जबाबदारी सुद्धा संबंधित कंत्राटदाराची आहे परंतु कचरा डेपोवर फेरफटका मारला असता या ठिकाणी केवळ कचऱ्याचे ढीग आढळून आले परंतु कचऱ्यावर करण्यात येणारी प्रक्रिया कुठेही निदर्शनास आली नाही. विशेष म्हणजे कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरीता या ठिकाणी काही मशनरी सुद्धा आढळून आल्या परंतु त्याचा वापर गेल्या अनेक दिवसांपासून करण्यात आल्याचे दिसून आले नाही तर कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरीता आवश्यक असणारी सिमेंटची टाकी या ठिकाणी उभारण्यात आली आहे परंतु त्याला सुद्धा गंज चढला असून त्याचा वापर सुद्धा केल्या अनेक दिवसांपासून करण्यात आल्याचे आढळून आले नाही त्यामुळे या ठिकाणी खरोखरच कचऱ्यावर प्रक्रिया होते की केवळ पैशावर प्रक्रिया होते? हा सुद्धा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांवर पडला आहे.

सर्वात महत्वाचे म्हणजे गेल्या काही वर्षांपुर्वी नागपूर येथील गिरीश काळे यांच्या मालकीच्या स्वप्नपुर्ती कंपनीकडे हा ठेका देण्यात आला होता. या ठेकेदाराची मुदत ही ३१ एप्रिल २०२६ रोजी संपली तरी त्याच कंपनीला मुदतवाढ देण्यात आली. नगरपरिषदेने अद्यापही यांसदर्भातील टेंडर प्रसिध्द केले नाही, त्यामुळे या सर्व बाबी संशयास्पद असुन ज्या पध्दतीने २५ ते ३० टन कचरा गोळी केल्याची बतावणी करुन कोटयवधी रुपयांची लुट संबंधित कंत्राटदाराने केली त्यावेळी नगरपरिषदेने अधिकारी व कर्मचारी मुक्या, बहिऱ्या आणि आंधळयाच्या भुमिकेत होते काय? शिवाय २५ ते ३० टन कचरा गोळा करण्यासाठी किती वाहने लागणात? त्या क्षमतेची वाहने नगरपरिषदेकडे आहेत का? असतील तर ती कोणती? आणि जी वाहने कचरा वाहून नेण्यासाठी नगरपरिषदेकडे आहेत, ती वाहने दिवसातून कचरा डेपो पर्यंत किती चकरा मारतात?

या विविध प्रश्न या निमित्ताने निर्माण होत आहे, त्यामुळे या सर्व प्रकरणाची जिल्हाधिकारी या विशेष अधिकाऱ्याची नेमणुक करुन चौकशी करुन सबंधितांवर निलंबनाची कारवाही करुन कंत्राटदाराला देण्यात आलेले कोटयवधी रुपयांचे देयक वसुल करावे, अशी मागणी आता जोर धरु लागली आहे.

# अमरावतीत दोन छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा जन्मदिवस आणि माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत बडनेरा विधानसभा मतदारसंघाकरीता गुरूवार, दि. २३ जुलै रोजी आमदार रवी राणा यांच्या नेतृत्वात आणि अमरावती विधानसभा मतदारसंघाकरीता शनिवारी, दि. २५ जुलै २०२६ रोजी आमदार सुलभा खोडके यांच्या नेतृत्वात श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे सकाळी १० वाजता शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

शिबीरामध्ये नागरिकांना विविध शासकीय व निमशासकीय योजनांचा लाभ एकाच छताखाली उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. यामध्ये रेशन कार्ड, संजय गांधी योजनेंतर्गत लाभ, महिलांना शेतकरी दर्जा देणे, मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना, विद्यार्थ्यांसाठी दाखले वाटप, सातबारामधील चुकांची दुरुस्ती, कर्ज वाटप शेतीशी निगडीत साहित्याचे वाटप, आयुष्यमान कार्ड वाटप, माहिलांना एसटी महामंडळाचे देण्यात येणारे स्मार्ट कार्ड वितरण, आधारकार्ड दुरुस्ती आदी सुविधांची माहिती आणि वितरण करण्यात येणार आहे.

नागरिकांनी शिबाराला उपस्थित राहावे, तसेच शासकीय योजनाचा लाभ घ्यावा. असे आवाहन उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांनी केले आहे.

# राज्यात पावसाचा जोर वाढणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – महाराष्ट्रात सध्या हवामानाचा मोठा लपंडाव सुरू असल्याचे चित्र आहे. राज्याच्या काही भागात पावसाने हजेरी लावली असली, तरी अनेक जिल्हे अजूनही दमदार पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात बुधवारी पावसाचा जोर वाढणार असून मुंबई, ठाणे, रायगड आणि पुण्याला थेट 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला आहे. तर, मराठवाड्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांत पावसाची शक्यता आहे. पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि पुणे, सातारा जिल्ह्यांतील घाटमाथ्यावर जोरदार पावसाचा 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे.

जागृत इंग्लिश प्रायमरी व हायर प्रायमरी स्कूल येथे

# विद्यार्थी पदग्रहण समारंभ उत्साह साजरा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**वरुड** – जागृत इंग्लिश प्रायमरी व हायर प्रायमरी स्कूल वरुड येथे विद्यार्थी पदग्रहण समारंभ उत्साह साजरा जागृत इंग्लिश प्रायमरी व हायर प्रायमरी स्कूल मध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता नवनिर्वाचित विद्यार्थी प्रतिनिधींचा पदग्रहण व शपथविधी सोहळा अत्यंत वातावरणात पार पडला.

कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे सचिव डॉ.मनोहर आंडे, बहुरूपी, शशिकांत बेलसरे, चौधरी, मनोज गुल्हाने, मुख्याध्यापिका पूजा मांडवगडे, पर्यवेक्षिका उज्वला लाडोळे सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यानंतर शाळेच्या बँड पथकाच्या तालावर नवनिर्वाचित संसदेच्या सदस्यांनी आकर्षक संचलन सादर केले. अतिथी आणि मुख्याध्यापिकांच्या हस्ते शाळेचा हेड बॉय कार्तिक बेलसरे, हेड गर्ल आनंदी निचित, व्हाईस कॅप्टन बॉय आराध्य खासबागे, व्हाईस कॅप्टन गर्ल खुशी घुगे, स्पोर्ट कॅप्टन अरसलान खान व नव्या सिनकर, डिसिप्लिन इन्चार्ज साई बेलसरे, मल्हार लव्हाळे, स्वरा धोटे, भूमिका गावंडे, कल्चरलर इन्चार्ज परीधी शुकेकर व कबीर वानखडे या सर्व कॅप्टन बॅज आणि सॅश देऊन अधिकृतपणे पदभार सोपविण्यात आला.

मुख्याध्यापिका यांनी सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना शाळेप्रति निष्ठा, प्रामाणिकपणा आणि कर्तव्याची पालन करण्याची शपथ दिली. यावेळी विद्यार्थ्यांचे चेहरे जबाबदारीच्या भावनेने आणि अभिमानाने प्रफुल्लीत झाले होते.

मुख्याध्यापिका पूजा मांडवगडे यांनी विद्यार्थ्यांना शाळेच्या असिस्टिक शिस्तीचे पालन करण्याचे आव्हान केले. शिक्षक भावेश आंबेकर यांनी संचालन तर उपस्थितांचे आभार मोहिनी जातीर यांनी मानले.

वृक्षारोपण उपक्रम उत्साहात संपन्न

# वृक्षारोपण उपक्रम उत्साहात संपन्न

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – पर्यावरण संवर्धनाचा संदेश जनमानसात पोहोचविण्याच्या उद्देशाने जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी संस्थान, नाणीजधाम यांच्या वतीने 'प्रत्येक भक्त का एक वृक्ष', 'एक पेड मा के नाम'जगद्गुरु श्रींच्या संदेशाप्रमाणे वरुड तालुका वतीने सेवा केंद्र राजुरा बाजार येथील हायस्कूलमध्ये वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

या उपक्रमात तालुक्यातील अनेक पदाधिकारी, सेवेकरी, सामाजिक कार्यकर्ते, युवक-युवती तसेच शाळेतील प्राचार्य शिक्षक व नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत विविध प्रकारच्या सावली व फळझाडांच्या रोपांचे वृक्षारोपण केले. याप्रसंगी राजुरा हायस्कूलचे प्राचार्य देशमुख, शाळेच्या शिक्षिका, माजी सरपंच किशोर गोमकाळे व वरुड तालुक्यातील सर्व भक्तगण उपस्थित होते.उपस्थितांनी पर्यावरण संरक्षणाची शपथ घेत लावलेल्या प्रत्येक वृक्षाचे संगोपन करण्याचा संकल्प केला.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी राजुरा बाजार येथील नर्सरी मालक प्रमोद बेलसरे यांनी निःशुल्क वृक्ष देऊन सेवा दिली तसेच सेवेकरी व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थितांनी अशा सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# वाघाचा बछडा मानवी वस्तीत सापडला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**रांजणी** – आंबेगाव तालुक्यातील शिंगवे गावच्या गोरडेमळा परिसरात मंगळवारी सकाळी वाघाचा सुमारे तीन महिन्यांचा बछडा थेट मानवी वस्तीत आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. मात्र ग्रामस्थांनी दाखविलेल्या सतर्कतेमुळे आणि वन विभागाच्या तत्पर कारवाईमुळे बछड्याला सुरक्षित ताब्यात घेण्यात आले. गोरडेमळा येथील रहिवासी बाळासाहेब पांडुरंग गोरडे यांच्या घरासमोरील शेडमध्ये सकाळी त्यांच्या पत्नी यांना हा बछडा दिसला. त्यांनी तातडीने दूरध्वनीद्वारे बाळासाहेब गोरडे यांना माहिती दिली.

# विद्युत खांबावरील ॲल्युमिनियम तार चोरटयांकडून लंपास तालुक्यातील महेंद्री शेतशिवारातील घटना

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – शेतात विज पुरवठा करणाऱ्या तालुक्यातील महेंद्री शेतशिवार परिसरातील विद्युत खांबावरील ॲल्युमिनियम तार अज्ञात चोरटयांनी लंपास केल्याची घटना नुकतीच उघडकीस आली.

या प्रकरणी अज्ञाताविरुध्द चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी तेजस्विनी बगाडे यांनी तक्रार दिली की, १६ जुलैला गणपत सखाराम श्रीखंडे यांनी पुसला विद्युत केंद्र येथे मौजा महेंद्री येथील त्यांच्या शेतामधील विद्युत तार वरील ॲल्युमिनियम तार कटरने कापून चोरून नेल्याची दिसले त्यामुळे विद्युत वितरण कंपनीचे अंदाजे ६० हजार रुपयांचे चोरुन नेल्यामुळे विद्युत वितरण चोरी गेल्याची लेखी तक्रार दिली त्याप्रमाणे फिर्यादी यांनी सदर श्रीखंडे डीपीवरील विद्युत वाहिनीच्या १५ पोल वरील पाहणी केली असता कोणीतरी अज्ञात इसमाने १५ जुलै ते १६ जुलै चे रात्री दरम्यान १५ पोल कंपनीचे नुकसान झाले आहे, अशा फिर्यादीच्या तक्रारी वरुन शेंदुरजनाघाट पोलिसांनी अज्ञात चोरटयाविरुध्द कलम ३०३, २ अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे.

डॉ.श्रेयश सरोदे यांच्या

# श्रीकृपा क्लिनिकच्या वैद्यकीय सेवेचा शुभारंभ

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – येथील प्रा.राजू गुलाबराव सरोदे यांचे सुपुत्र डॉ.श्रेयश सरोदे यांनी वैद्यकीय पदवी बीएएमएस व पदव्युत्तर शिक्षण एमडी पूर्ण करून आपल्या कर्मभूमी असलेल्या शेंदुरजनाघाट येथे श्रीकृपा क्लिनिक येथे वैद्यकीय सेवेचा शुभारंभ केला आहे.

क्लिनिकचे उदघाटन अंत्योदय इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स अँड रिसर्च सेंटर, देवग्राम (ता.नरखेड) अधिष्ठाता तसेच ओंकार पंचकर्म चिकित्सालय वरुडचे संचालक डॉ.किशोर तरार यांचे हस्ते संपन्न झाले. यावेळी प्रा.राजु सरोदे, संजय सरोदे, डॉ.सुरेखा तरार, डॉ.श्रीधर गणोरकर, डॉ.श्रीनिवास मांडळे, डॉ.आशिष काळे, डॉ.राहुल खन्ना, डॉ.सुमित रामटेके, डॉ.पंकज केचे, डॉ.रुशाली काळे, अमित पांगुल, विजय चौधरी, सुभाष गणोरकर यांच्यासह ग्रामस्थ व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या क्लिनिकमध्ये जनरल फिजिशियन, बालरोग उपचार, स्त्रीरोग उपचार व सल्ला, त्वचारोग उपचार तसेच विविध आजारांवरील उपचार उपलब्ध राहणार असल्याची माहिती डॉ.श्रेयश सरोदे यांनी दिली. शेंदुरजनाघाट व परिसरातील नागरिकांनी नव्याने सुरू झालेल्या श्रीकृपा क्लिनिक मध्ये आरोग्य सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

भारतीय बौद्ध महासभा शाखेच्या वतीने

# नवनियुक्त ठाणेदार राहुल गवई यांचे स्वागत



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – भारतीय बौद्ध महासभा शाखा शेदुंरजनाघाटच्या वतीने नव्याने रुजू झालेले शेंदुरजनाघाट पोलीस स्टेशनचे ठाणेदार राहुल गवई यांचे पुष्पगुच्छ देऊन पोलीस स्टेशन येथे स्वागत करण्यात आला. हा स्वागत सोहळा भारतीय बौद्ध महासभा शाखाध्यक्ष रमेश कुसळे, सुशील बागडे, विनोद देशभ्रतार, भारतीय बौद्ध महासभा जिल्हा सदस्य गोपाल पाटील यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

जिल्हा परिषद पूर्व म

# जिल्हा बँकेचे सभासद म्हणुन प्रमोद टाकरखेडे यांची निवड

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – येत्या काही दिवसांमध्ये होवु घातलेल्या अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडीच्या प्रक्रियेसंदर्भात सद्य: हलचल सुरु झाली असून शहरातील नामांकीत अशा संत्रा बागाईतदार सहकारी समिती वरुड र.नं.१२८३ येथून बँकेवर सभासद म्हणुन प्रमोद शंकरराव टाकरखेडे यांची निवड झाली आहे.

प्रमोद टाकरखेडे हे गेल्या अनेक वर्षांपासुन विविध सामाजिक कार्यामध्ये सहभागी असून विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी म्हणुन सुध्दा त्यांनी कार्य केले आहे. अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडीच्या प्रक्रियेकरीता बँकेच्या सभासदांच्या निवडीची प्रक्रिया तालुक्यात सुरु आहे. संत्रा बागाईतदार सहकारी समिती वरुड र.नं.१२८३ या ठिकाणी बँक सभासदाची प्रक्रिया राबविण्यात आली. यामध्ये विद्यमान अध्यक्ष शरद खेरडे यांच्या पत्नी सुष्मा शरद खेरडे व प्रमोद शंकरराव टाकरखेडे यांच्या लढत होवुन प्रमोद टाकरखेडे यांना ८ मते तर सुष्मा खेरडे यांना ४ मते प्राप्त झाली. या निवड प्रक्रियेत प्रमोद टाकरखेडे यांचा विजय झाला.

विशेष म्हणजे शरद खेरडे हे या संस्थेचे अध्यक्ष असून सुध्दा त्यांच्या पत्नी सुष्मा खेरडे या विजय संपादन करु न शकल्याने हा विषय चांगलाच चर्चीला जात आहे. प्रमोद टाकरखेडे यांच्या निवडीबददल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केल्या जात आहे.

विवाहितेच्या मानसिक व शारिरीक छळ प्रकरणी

# पतीसह तिघांविरुध्द गुन्हे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – विवाहितेला माहेरुन पैसे आणण्यासाठी तगादा लावुन तिचा मानसिक व शारिरीक छळ केल्याप्रकरणी बेनोडा (शहीद) पोलिसांनी पती सह सारसकडील तिघांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद तिन्ही आरोपी नावे मंगेश रमेश वरघट (२५), सुशीला रमेश वरघट, रमेश वरघट (५५) तिन्ही रा.सिध्दार्थ नगर अमरावती यांनी फिर्यादी महिलेस माहेरहून पैसे आणण्याचा तगादा लागत शिवीगाळ करून शारिरीक व मानसिक छळ केला. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला.

या प्रकरणी फिर्यादी श्वेता वरघट हिचे तक्रारीवरुन बेनोडा (शहीद) पोलिसांनी मंगेश रमेश वरघट (२५), सुशिला रमेश वरघट, रमेश बरघट (५५) तिन्ही रा.सिध्दार्थ नगर अमरावती यांचे विरुध्द कलम ८५, ३, ३५२ बी.एन.एस. अन्वये गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास सुरु आहे.

# संपादकीय

**मोठी स्वप्ने पाहणारेच मोठी स्वप्ने सत्यात उतरवू शकतात.**

## अजित पवार : अनुभवी नेतृत्व, विकासाचा ध्यास आणि राजकीय आव्हाने

महाराष्ट्राच्या राजकारणात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत, ज्यांचा प्रभाव केवळ पक्षापुरता मर्यादित राहत नाही, तर राज्याच्या प्रशासनावर आणि विकासाच्या प्रक्रियेवरही दिसून येतो. उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित अनंतराव पवार हे असेच एक प्रभावी आणि अनुभवी नेतृत्व आहे. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ त्यांनी राज्याच्या राजकारणात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या कार्यपद्धतीत निर्णयक्षमता, प्रशासनावरील पकड आणि विकासकामांना प्राधान्य देण्याची वृत्ती स्पष्टपणे दिसून येते. मात्र, त्यांच्या राजकीय प्रवासात अनेक वाद, पक्षांतर आणि बदलत्या राजकीय समीकरणांमुळे त्यांच्यावर टीकाही झाली आहे.
अजित पवार यांनी बारामती विधानसभा मतदारसंघाचे अनेक वेळा प्रतिनिधित्व केले आहे. सहकार, सिंचन, ऊर्जा, वित्त, नियोजन, ग्रामविकास अशा अनेक महत्त्वाच्या खात्यांची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे सांभाळली आहे. विशेषतः अर्थमंत्री म्हणून राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना त्यांनी विकासाभिमुख धोरणांना प्राधान्य दिले. पायाभूत सुविधा, कृषी, उद्योग, शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रांमध्ये निधीची तरतूद करून विकासाला गती देण्याचा प्रयत्न त्यांनी सातत्याने केला आहे. त्यांच्या कार्यशैलीचे वैशिष्ट्य म्हणजे जलद निर्णय घेणे आणि अधिकाऱ्यांकडून वेळेत काम पूर्ण करून घेणे. अनेक प्रशासकीय बैठकींमध्ये त्यांचा स्पष्ट आणि कठोर दृष्टिकोन दिसून येतो. त्यामुळे प्रशासनात शिस्त निर्माण झाल्याचे समर्थकांचे मत आहे. अनेक विकास प्रकल्पांना त्यांनी गती दिली, तर रखडलेल्या योजनांना मंजुरी देऊन त्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले. शेती आणि ग्रामीण विकास हा अजित पवार यांच्या राजकारणाचा महत्त्वाचा भाग राहिला आहे. शेतकऱ्यांसाठी सिंचन सुविधा, जलसंधारण, कृषी पायाभूत सुविधा आणि बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विविध निर्णय घेण्यात त्यांचा सहभाग राहिला आहे. दुष्काळग्रस्त भागांसाठी जलव्यवस्थापन आणि सिंचन प्रकल्पांना चालना देण्याचे प्रयत्न त्यांनी केले. मात्र, सिंचन प्रकल्पांशी संबंधित कथित अनियमिततेच्या आरोपांमुळे त्यांना राजकीय टीकेलाही सामोरे जावे लागले. या प्रकरणांवर विविध स्तरांवर चौकशी झाली, परंतु राजकीय आरोप-प्रत्यारोपांचा विषय आजही कायम आहे. राजकीयदृष्ट्या अजित पवार यांचा प्रवास अनेक चढ-उतारांनी भरलेला आहे. २०१९ मधील पहाटेच्या शपथविधीपासून ते २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील मोठ्या फुटीनंतर सत्तेत सहभागी होण्यापर्यंत त्यांच्या निर्णयांनी राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ घडवून आणली. या घटनांमुळे त्यांच्या समर्थकांनी त्यांच्या निर्णयक्षमतेचे कौतुक केले, तर विरोधकांनी त्यांच्यावर विचारधारेशी तडजोड केल्याचा आरोप केला. त्यामुळे ते नेहमीच चर्चेच्या केंद्रस्थानी राहिले आहेत.
आज महाराष्ट्रात महायुती सरकारमध्ये उपमुख्यमंत्री म्हणून अजित पवार यांच्यावर मोठी जबाबदारी आहे. राज्याची आर्थिक स्थिती मजबूत ठेवणे, विकासकामांना गती देणे, गुंतवणूक आकर्षित करणे आणि रोजगारनिर्मितीला चालना देणे ही त्यांच्या समोरील प्रमुख आव्हाने आहेत. वाढती महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या समस्या, पायाभूत सुविधांचा विकास आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक गरजा यावर प्रभावी उपाययोजना करणे अपेक्षित आहे. अर्थमंत्री म्हणून त्यांनी महसूल वाढविणे आणि खर्चाचे संतुलन राखण्याचा प्रयत्न केला आहे. उद्योग क्षेत्रासाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे, नवीन गुंतवणूक आणणे आणि राज्याच्या आर्थिक प्रगतीला गती देण्यासाठी विविध धोरणात्मक निर्णय घेतले जात आहेत. मात्र, या योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि त्याचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचणे तितकेच महत्त्वाचे आहे.
अजित पवार यांच्या नेतृत्वाची आणखी एक जमेची बाजू म्हणजे प्रशासनातील अनुभव. विविध विभागांतील अधिकाऱ्यांशी समन्वय साधून विकासकामे वेगाने पूर्ण करण्याची त्यांची क्षमता अनेकदा दिसून आली आहे. त्यांच्या बैठका, कामाचा वेग आणि वेळेचे नियोजन यामुळे त्यांना 'काम करणारे नेते' अशी प्रतिमा मिळाली आहे. तथापि, काही वेळा त्यांच्या स्पष्टवक्तेपणामुळे किंवा कठोर वक्तव्यांमुळे वादही निर्माण झाले आहेत. राजकीय नेतृत्वाचे मूल्यमापन करताना केवळ लोकप्रियता नव्हे, तर दीर्घकालीन परिणामही महत्त्वाचे असतात. अजित पवार यांच्या कारकिर्दीत विकासकामांसोबतच अनेक वाद आणि राजकीय बदलही पाहायला मिळाले. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व हे यश आणि वाद यांचा संगम मानले जाते. समर्थक त्यांच्या कार्यक्षमतेचे कौतुक करतात, तर टीकाकार पारदर्शकता, नैतिकता आणि राजकीय भूमिकेतील सातत्यावर प्रश्न उपस्थित करतात.

# मोजकेच बोलणारं, पण कृतीतून सिद्ध करणारं व्यक्तिमत्व

भगवद्गीतेमध्ये श्रीकृष्णानं उत्कृष्टतेची (श्रेष्ठतेची) एक अशी व्याख्या दिली आहे, जी युगायुगांपासून अमर आहे. योगः कर्मसु कौशलमब (कामातील कुशलता म्हणजेच योग). जर आधुनिक भारतीय सार्वजनिक जीवनात असा कोणता नेता शोधायचा असेल, ज्यानं स्वतः कधीही या श्लोकाचा उल्लेख न करता तो आपल्या आयुष्यात पूर्णपणे उतरवला आहे, तर तो शोध नागपूरच्या देवेंद्र गंगाधरराव फडणवीस यांच्या उंबरठ्यावर येऊन संपतो.

ही कथा केवळ प्रभावी वक्तृत्वाची नाही. महाराष्ट्राने यापेक्षाही अधिक प्रभावी आणि बुलंद वक्ते पाहिले आहेत. ही कथा अशा एका व्यक्तीची आहे, ज्यांनी आपल्या तब्बल ३४ वर्षांच्या सार्वजनिक जीवनातील प्रत्येक टप्प्यावर भाषणांपेक्षा आपल्या कामगिरीची नोंदच बोलकी ठरवली. आणि जेव्हा नियतीने त्यांच्या हातातील ती कामगिरीची वही हिसकावून घेतली, तेव्हा त्यांनी कोणताही गाजावाजा न करता शांतपणे नव्या कामाची नवी वही उघडली.

### नागपूरमधील सुरुवातीचे संस्कार आणि राजकीय वाटचाल

त्यांचा संयमी स्वभाव सुरुवातीच्या काळातच घडला. १९७५ मध्ये जेव्हा आणीबाणीच्या काळात त्यांचे वडील, जनसंघाचे आमदार गंगाधरराव फडणवीस यांना तुरुंगात टाकण्यात आलं, तेव्हा अवघ्या पाच वर्षांच्या देवेंद्र यांनी आपल्या वडिलांना तुरुंगात टाकणाऱ्या पंतप्रधानांच्या नावानं असलेल्या शाळेत जाण्यास नकार दिला. तो एका बालकाचा निषेध होता, पण त्यातून त्यांच्या विचारांचा खंबीरपणा दिसून आला. विचार शांतपणे जपायचे, पण त्यावर ठामपणे अंमलबजावणी करायची.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने त्यांच्या या विचारांना एक शिस्तबद्ध आकार दिला आणि त्यांना एक दुर्मिळ सांस्कृतिक दृष्टिकोन दिला. नागपूर हे केवळ एक शहर नाही; ते संघाचे केंद्र आहे. तेथे वाढलेल्या या तरुणाने लहानपणीच हे आत्मसात केले की राजकारण हे केवळ एका सखोल ध्येयाचे - एका संस्कृतीचा स्वाभिमान पुनरुज्जीवित करण्याचे - बाह्य माध्यम आहे. १९९२ मध्ये, वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी, त्यांनी नागपूर महानगरपालिकेत भारतातील सर्वात तरुण नगरसेवकांपैकी एक म्हणून प्रवेश केला. पाच वर्षांनंतर, वयाच्या २७ व्या वर्षी, ते देशाच्या इतिहासातील सर्वात तरुण महापौरांपैकी एक बनले.

ज्यांना केवळ शोभेचे महापौर अपेक्षित होते, त्यांनी देवेंद्र फडणवीसांना ओळखण्यात चूक केली. त्यांनी महानगरपालिकेच्या फाईलकडे राज्याच्या अर्थसंकल्पाइतक्याच गांभीर्याने पाहिले - स्वच्छता, नागरी वित्त आणि प्रशासकीय उत्तरदायित्व. नगरसेवक म्हणून घालवलेल्या या वर्षांनी त्यांना लुटियन्सच्या वर्गापेक्षा खूप मोठे धडे शिकवले. अंतिम शासन हे पाण्याचे कनेक्शन, मालमत्ता कराच्या नोंदी आणि रस्त्यावरील काम करणाऱ्या दिव्यांबद्दल असते.

१९९९ मध्ये त्यांनी नागपूर पश्चिम (नंतरचे नागपूर दक्षिण-पश्चिम) मतदारसंघातून विधानसभेत प्रवेश केला; ही ती जागा आहे जिथून ते आजपर्यंत कधीही पराभूत झालेले नाहीत. २००३ पर्यंत, राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या (उझअ) महाराष्ट्र शाखेने त्यांना राज्याचे 'उत्कृष्ट संसदपटू' (उत्कृष्ट आमदार) म्हणून सन्मानित केले.

### विरोधी पक्षातील वर्षे: गृहपाठ म्हणजेच राजकारण

२००० च्या दशकात आणि २०१० च्या सुरुवातीला, फडणवीस यांनी विरोधी बाकांवरील सर्वात अभ्यासू नेता म्हणून आपली ओळख निर्माण केली. सिंचन घोटाळ्याचा पर्दाफाश हा त्यांचा महत्त्वाचा टप्पा होता - हजारो पानांची कागदपत्रे आणि अभ्यास, पण एकही पुराव्याविना आरोप नाही. जेव्हा २०१३ मध्ये पक्षाने त्यांना महाराष्ट्र भाजपचे प्रदेशाध्यक्ष केले, तेव्हा ती त्यांच्या कामगिरीची पावती होती. इतर नेते जेव्हा केवळ नाट्य निर्माण करत होते, तेव्हा हा नेता आपला पूर्ण अभ्यास करत होता.

यानंतर २०१४ च्या निवडणुकीतील विजयाने त्यांना वयाच्या ४४ व्या वर्षी महाराष्ट्राच्या इतिहासातील दुसरे सर्वात तरुण आणि भाजपचे पहिले मुख्यमंत्री बनवले. विदर्भातील हा ब्राह्मण चेहरा मराठाबहुल राजकारणात टिकू शकणार नाही, अशी भविष्यवाणी अनेकांनी केली होती. परंतु, वसंतराव नाईक यांच्यानंतर सलग पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणारे ते राज्याचे पहिले मुख्यमंत्री ठरले.

### पहिला कार्यकाळ: पायाभूत सुविधा हाच विचार

पाच वर्षांत त्यांनी काय साध्य केले? नागपूर ते मुंबई दरम्यानचा ७०१ किलोमीटरचा समृद्धी महामार्ग हा केवळ घोषित करण्यात आला नाही, तर त्याला निधी उपलब्ध करून देण्यात आला, जमीन अधिग्रहित करण्यात आली आणि तो प्रत्यक्षात आणला गेला. यामुळे १६ तासांचा प्रवास आता आठ तासांवर आला असून विदर्भ आणि मराठवाड्याला राज्याच्या मुख्य आर्थिक प्रवाहाशी जोडले. मुंबई मेट्रोचा विस्तार, कोस्टल रोड, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (अटल सेतू), मुंबई-पुणे मिसिंग लिंक, नवी मुंबई विमानतळाचा विस्तार आणि गडचिरोलीतील नक्षलवादाचा यशस्वी बीमोड - या प्रत्येक प्रकल्पाला याच काळात गती मिळाली.

हा पॅटर्न स्पष्ट आहे: फडणवीस यांच्यासाठी पायाभूत सुविधा हे केवळ फोटो काढण्याचे साधन नाही. ते प्रत्यक्ष आकार घेणारे ध्येय आहे - ही अशी धारणा आहे की, एखादी संस्कृती स्वतःचे निर्माण करूनच पुनरुज्जीवित होते.

पहिल्या कार्यकाळात त्यांची सर्वात मोठी आणि शांत परीक्षा झाली. १ जानेवारी २०१८ रोजी भीमा कोरेगाव येथील हिंसेमुळे राज्याची सामाजिक वीण धोक्यात आली होती. एका कमकुवत सरकारने नाट्यमय प्रतिक्रिया दिली असती. पण त्यांच्या प्रशासनाने ही हिंसा उत्स्फूर्त नसून घडवून आणलेली आहे हे ओळखले. एल्गार परिषदेच्या मागे असलेल्या सूत्रांचा तपास केला आणि विजय स्तंभाच्या अभिवादनाचे पावित्र्य पुनर्स्थापित केले. तेव्हापासून दरवर्षी १ जानेवारीला लाखो लोक कोणत्याही अडथळ्याविना शांततेत श्रद्धांजली अर्पण करतात.

### पाणी: एका मोठ्या धरणाऐवजी लाखो लहान बंधारे

महाराष्ट्राची शोकांतिका नेहमीच विषम आकडेवारीची राहिली आहे. देशातील ४० टक्के मोठी धरणं असूनही सिंचनाची टक्केवारी सर्वात कमी. फडणवीस यांनी हे मॉडेल बदललं. 'जलयुक्त शिवार' योजनेनं एक मोठा जलाशय बांधला नाही, तर १६ हजारहून अधिक दुष्काळग्रस्त गावांमध्ये लाखो लहान-लहान बंधारे, शेततळी आणि नाले रुंदीकरणाची कामं केली. 'मागेल त्याला शेततळे' या योजनेनं उद्दिष्ट ओलांडलं.

आणि त्यांच्या पुढील कार्यकाळात ही संकल्पना गावातील तलावांपासून नदी जोड प्रकल्पांपर्यंत विस्तारली. ८८,००० कोटींहून अधिक खर्चाच्या 'वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्पाला' मंजुरी देण्यात आली, ज्यामुळे विदर्भातील पावसाचं अतिरिक्त पाणी दुष्काळी पट्ट्यात नेलं जाईल. याशिवाय मराठवाडा वॉटर ग्रीड आणि नार-पार-गिरणा जोड प्रकल्पामुळे राज्यातील सर्वात जास्त पाणीटंचाई असलेल्या भागांना दिलासा मिळाला. त्यांच्यापूर्वी कोणत्याही मुख्यमंत्र्यांनी दुष्काळाकडे एका ठराविक मुदतीतील अभियांत्रिकी समस्या म्हणून पाहिलं नव्हतं.



### शेतकऱ्यांची खाती

येथील आकडेवारी शांतपणे समजून घेण्यासारखी आहे. २०१७ मध्ये, 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजने'अंतर्गत ८९ लाख शेतकरी कुटुंबांचे ३४,००० कोटी रुपयांहून अधिक कर्ज माफ करण्यात आलं, त्यावेळची ही राज्यातील सर्वात मोठी शेतकरी मदत होती.

पीएम-किसान आणि नमो शेतकरी महासन्मान निधीअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दरवर्षी १२,००० रुपये (केंद्र सरकारकडून ६,००० रुपये आणि राज्य सरकारकडून ६,००० रुपये) मिळतात. त्यांच्या वित्तमंत्रीपदाच्या काळातील अर्थसंकल्पात, 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजने'द्वारे २ लाख रुपयांपर्यंतचे पीककर्ज माफ करण्यात आलं आणि प्रामाणिकपणे कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना ५०,००० रुपयांचं प्रोत्साहन अनुदान देण्यात आलं. दशकांपासून प्रामाणिक शेतकरी थकितदारांना मदत करत होता; फडणवीस हे पहिले मुख्यमंत्री आहेत ज्यांनी सवलतीसोबतच शिस्तीचाही पुरस्कार केला. यामध्ये शेतीसाठी दिवसा वीज देणाऱ्या सौर कृषी वाहिन्यांची जोड दिली.

### आरक्षणाचा तिढा आणि प्रशासकीय कौशल्य

महाराष्ट्राच्या प्रत्येक मुख्यमंत्र्यासमोर एकच कठीण आव्हान होतं. मराठा आरक्षणाची मागणी आणि इतर मागासवर्गीयांच्या हक्कांचं रक्षण. बहुतेकांनी जुना राजकीय मार्ग निवडला - समिती स्थापन करा, आंदोलन काढा आणि प्रश्न पुढील सरकारवर ढकलून द्या. फडणवीस यांनी हा प्रश्न थेट सोडवण्याचा निर्णय घेतला. २०१८ मध्ये, त्यांच्या सरकारनं भक्कम मागासवर्गीय कागदपत्रांच्या आधारे मराठा आरक्षण कायदा संमत केला आणि तो उच्च न्यायालयातही टिकला.

नंतर सर्वोच्च न्यायालयानं ५० टक्क्यांच्या मर्यादेवर तो रद्द केला, तेव्हा महायुती सरकारनं २०२४ मध्ये १० टक्के डएइउ कायदा आणला, जो न्यायालयाच्या विशिष्ट हरकतींना उत्तर देण्यासाठी तयार केला गेला होता - जइउ कोट्यातून एक टक्काही न कमी करता मराठा समाजाला आरक्षण दिले गेले.

त्यानंतर सप्टेंबर २०२५ मध्ये जेव्हा मुंबईच्या आझाद मैदानावर आंदोलन पोहचले, तेव्हा संपूर्ण राज्य चिंतेत होते. इतर ठिकाणी अशी आंदोलने लाठीमार, गोळीबार आणि जाळपोळीत संपली आहेत. पण महाराष्ट्रात: पाच दिवसांची चर्चा, १९१८ च्या हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणी करणारा जीआर, ज्यामुळे पुराव्यांच्या आधारे कुणबी नोंद असलेल्या मराठवाड्यातील मराठ्यांना प्रमाणपत्रे मिळाली आणि गर्दी शांततेत परतली. एकाही ओबीसी हक्काला धक्का लागला नाही; फडणवीस यांनी हे सभागृहात आणि ओबीसी नेत्यांना थेट सांगितले.

एका मराठा-बहुल राजकारणात, एका ब्राह्मण मुख्यमंत्र्याने आंदोलनाचा संपूर्ण ताप सहन केला, आणि एकही जीव न गमावता तो प्रश्न सोडवला. मराठा आकांक्षा एका बाजूला आणि ओबीसी संरक्षण दुसऱ्या बाजूला - दोन्ही तराजू समतोल ठेवणे हे केवळ व्यवस्थापन नाही, ते 'उत्कृष्ट मुत्सद्देगिरी' आहे.

### गुंतवणुकीचं केंद्र

दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्रानं पहिल्याच दिवशी १४.५ लाख कोटी रुपयांचा सामंजस्य करार केले आणि एकूण ३० लाख कोटी रुपयांच्या (सुमारे ३६० बिलियन) करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. ही रक्कम महाराष्ट्राच्या वार्षिक अर्थसंकल्पाच्या जवळपास पाच पट आहे. यात ८३ टक्के परकीय थेट गुंतवणूक १८ देशांमधून आली आहे आणि मागील वर्षाच्या करारांची अंमलबजावणी दर ७५ टक्के आहे. यातून पुढील दशकात ३० ते ४० लाख रोजगारांची निर्मिती अपेक्षित आहे.

### या गुंतवणुकीचा भौगोलिक विस्तार पाहा

टाटा समूहासोबत मुंबईजवळ भारतातील पहिले इनोव्हेशन सिटी; १ लाख कोटी रुपयांचा हायपरस्केल डेटा सेंटर पार्क; रायगड-पेण ग्रोथ सेंटर; छत्रपती संभाजीनगरसाठी ५५,००० कोटी रुपये; नाशिक, जळगाव आणि अहिल्यानगरसाठी ५०,००० कोटी रुपये; नागपूर आणि विदर्भासाठी २.७ लाख कोटी रुपये - ज्यामध्ये गडचिरोलीतील आर्सेलरमित्तलचा १.१ लाख कोटी रुपयांचा ग्रीन स्टील प्लांट समाविष्ट आहे.

एकेकाळी केवळ भूसुरुंगांसाठी प्रसिद्ध असलेला गडचिरोली जिल्हा आज 'स्टील सिटी' बनत आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण नक्षलविरोधी अभियानामुळे हा जिल्हा नक्षलमुक्त होण्याच्या मार्गावर आहे. फडणवीस यांचे नक्षलवादाला उत्तर केवळ बंदूक नव्हते; तर ते कारखाने, खाण भाडेपट्टे आणि रोजगाराच्या संधी हे होते. महाराष्ट्र आज भारताची जीएसटी राजधानी आहे आणि १ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे.

### सांस्कृतिक पुनरुज्जीवन

त्यांनी भूषवलेल्या प्रत्येक भूमिकेमागे एक ठाम विश्वास राहिला आहे. महाराष्ट्राचा विकास हा त्याच्या सांस्कृतिक स्वाभिमानाच्या पुनरुज्जीवनाशिवाय अपूर्ण आहे. त्यांनी हे स्पष्टपणे सांगितले आहे की, ते एक गर्विष्ठ हिंदू आहेत - आणि नंतर कामातून ते सिद्ध केले आहे.

औरंगाबाद आता 'छत्रपती संभाजीनगर' आहे; उस्मानाबाद 'धाराशिव' आहे, अहमदनगर 'अहिल्यानगर' आहे. ज्या किल्ल्यांवर स्वराज्याचा इतिहास रचला गेला, त्यांची डागडुजी करण्यात आली, अतिक्रमणे हटवण्यात आली आणि जुलै २०२५ मध्ये महाराष्ट्राच्या १२ किल्ल्यांच्या 'मराठा मिलिटरी लँडस्केप्स'ला युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ म्हणून मान्यता दिली.

गडचिरोलीच्या जंगलात सशस्त्र नक्षलवादाचा बीमोड केल्यानंतर, त्यांनी शहरातील नक्षलवादी विचारसरणीकडे मोर्चा वळवला. जुलै २०२५ मध्ये गृहमंत्री म्हणून त्यांनी 'महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा विधेयक' संमत करून घेतले, ज्यामुळे नक्षलवादी संघटनांच्या फ्रंटल ऑर्गनायझेशनवर बंदी घालण्यात आली. परंतु त्यांनी सभागृहात स्पष्ट केले की, हा कायदा केवळ संविधानाला आव्हान देणाऱ्यांवरच कारवाई करेल. कायद्याचा दुरुपयोग न करता शांतता प्रस्थापित करणे हे त्यांच्या गृहमंत्रीपदाचे वैशिष्ट्य आहे.

### गृह मंत्रालय: ६० दिवसांत न्याय

गृहमंत्री म्हणून त्यांची कार्यपद्धती स्पष्ट आहे: कोणताही गाजावाजा नाही, फक्त कडक कारवाई. १ मे २०२६ रोजी पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर झालेला अत्याचार आणि हत्येच्या घटनेने महाराष्ट्र हादरला होता. त्यानंतरची कारवाई पाहा: दुसऱ्याच दिवशी आरोपीला अटक, १५ दिवसांत १२-शे पानांचे चार्जशीट, १६ दिवसांत ५५ साक्षीदारांची तपासणी आणि ६० दिवसांच्या आत विशेष न्यायालयाकडून फाशीची शिक्षा. ज्या देशात खटले वर्षांनुवर्षे चालतात, तिथे महाराष्ट्राने ६० दिवसांत न्याय देऊन एक नवा मानदंड निर्माण केला.

लोहगड किल्ल्यावर तरुण उद्योगपती केतन अग्रवाल यांच्या हत्येनंतरही त्यांनी जलदगती न्यायालय आणि विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांची नियुक्ती केली. पण त्यांनी समाजाला विचार करायला लावणारा प्रश्न विचारला: शिक्षित आणि सुशिक्षित घरातील मुले अशा गुन्हेगारी प्रवृत्तीकडे का वळत आहेत? गुन्ह्याकडे केवळ कायद्याच्या चौकटीतून न पाहता सामाजिक दृष्टिकोनातून पाहणारा गृहमंत्री दुर्मिळ असतो. कायद्याचे राज्य आणि वेगवान न्याय प्रक्रिया ही त्यांची ओळख आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# महापालिका मुख्यालय इमारतीला वाळवी

■ (प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – मुंबई महापालिकेच्या कारभारावर टीका होत असताना तसेच भविष्यातील आर्थिक संकटाबाबत चिंता व्यक्त केली जात असतानाच महापालिका मुख्यालयाच्या दरवाज्यांनाच वाळवी लागल्याचे प्रकार समोर येत आहे. सध्या वारंवार होत असलेले आरोप आणि टीका हे पाहता महापालिकेच्या कारभारालाच वाळवी लागल्याचे हे द्योतक असल्याचे मानले जात आहे. मुंबई महापालिका मुख्यालय विस्तारीत इमारतीच्या नुतनीकरणाबाबत महापालिकेच्यावतीने ३१ऑगस्ट २००९ला स्थायी समितीच्या ठरावानुसार शानदार इंटेरीअर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला विविध करांसह तसेच सल्लागार शुल्कासहित ८५. ३९ कोटी रुपयांचे कंत्राट दिले होते. हे कंत्राट ३६ महिन्यांकरता होते. त्यामुळे हे काम २०१२पर्यंत होते. परंतु २१ जून २०१२ला मंत्रालयात लागलेल्या आगीनंतर तत्कालिन आयुक्तांनी या विस्तारीत इमारतीच्या कामांमध्ये बदल केला.

# हायकोर्टाने सरकार, पालिकेला ठणकावले : सार्वजनिक प्रकल्प अर्ध्यावर रद्द केल्यास अधिकाऱ्यांनी स्वत: भरपाई द्यावी

■ (प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – सार्वजनिक प्रकल्प अर्ध्यातच अचानक रद्द केल्यामुळे होणाऱ्या नुकसानाची भरपाई सरकारी अधिकारी किंवा पालिका अधिकाऱ्यांनी स्वतःच्या खिशातून द्यावी, करदात्यांच्या पैशातून नाही, अशा शब्दांत उच्च न्यायालयाने राज्य सरकारचे अधिकारी तसेच बृहन्मुंबई महापालिका प्रशासनातील अधिकाऱ्यांना ठणकावले. याप्रकरणी संबंधित प्रशासनाकडून उत्तर मागवत न्यायालयाने पुढील सुनावणी १८ ऑगस्ट रोजी निश्चित केली. दक्षिण मुंबईतील मुंबादेवी मंदिरासमोरील वाहनतळ (पार्किंग) प्रकल्पाचे काम अचानक थांबवल्याने 'मेसर्स एसएमएस लिमिटेड' या कंपनीने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. मुंबई महानगरपालिकेने मुंबादेवी परिसरात १२२ कोटी रुपयांचा १७ मजली रोबोटिक पार्किंग प्रकल्प सुरू केला होता. पालिकेने गेल्या वर्षी या चालू प्रकल्पाचे काम अचानक थांबवले. काम अर्ध्यात थांबवल्यामुळे कंपनीचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले असून, त्यांनी याप्रकरणी लवाद प्रक्रिया सुरू केली आहे. याबाबत पालिकेच्या वकिलांनी सांगितले की, प्रकल्पाचे पायाभरणीपर्यंत काम पूर्ण झाले होते. तसेच काम पुढे सुरू ठेवण्यासाठी पालिकेने राज्य सरकारला अनेक पत्रे लिहिली आहेत.

# 'प्रामाणिकपणा, निष्ठा माझ्या डीएनए मध्येच...'

■ (प्रतिनीधी वरूड दर्पण)

## श्रेयस तळपदे, काजल अग्रवालनं घेतली तुकाराम मुंढेंची भेट, 'ते' उत्तर ऐकून अभिनेत्रीनं थेट ठोकला सलाम



**नवी दिल्ली** – सामाजिक आशय असलेल्या बहुचर्चित 'द इंडिया स्टोरी'या कोर्टरूम ड्रामा येत्या २४ जुलैला प्रदर्शित होणार आहे. या सिनेमात मराठमोळा अभिनेता श्रेयस तळपदे आणि अभिनेत्री काजल अग्रवाल मुख्य भूमिकेत झळकणार आहेत.

अन्नपदार्थांमध्ये – होणारी भेसळ, कीटकनाशकांचा अतिवापर यामुळे जनतेच्या आरोग्यावर विशेषतः लहान मुलांवर किती मोठ्या प्रमाणात परिणाम होतोय याचं वास्तव या सिनेमातून दाखवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

सध्या एफडीएच्या धडक कारवायांमुळे सोशल मीडियावर भेसळयुक्त पदार्थांबाबत मोठी चर्चा रंगली आहे. एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी अनेक दुकानं, हॉटेल्स आणि दूध डेअरींवर धाड मारत कित्येक टनांचा भेसळयुक्त अन्नपदार्थांचा साठा सील केला आहे.

तेव्हापासूनच भेसळीचं धडकी भरवणारं वास्तव सर्वांसमोर आलं असून यामुळे सर्वसामान्यांना धडकी भरली आहे. काजल आणि श्रेयसचा आगामी सिनेमाही अन्नपदार्थांमध्ये केली जाणारी भेसळ, यावर आधारित आहे, याच पार्श्वभूमीवर नुकतीच श्रेयास तळपदे आणि काजल अग्रवाल यांनी अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांची भेट घेतली आहे.

तुकाराम मुंढे यांची भेट घेतल्यानंतर अभिनेत्री काजल अग्रवाल हिनं सविस्तर पोस्ट शेअर करत त्यांचं कौतुक केलंय. तुकाराम मुंढे यांच्या भेटीनंतर अभिनेत्री अभिनेत्री काजल अग्रवाल काय म्हणाली? अभिनेत्री काजल अग्रवाल हिनं लिहिलंय की, 'सरांना भेटून खरंच खूप छान वाटलं. सर, करत असलेल्या कामाचा मला नेहमीच आदर वाटतो. या भेटीदरम्यान, त्यांचा प्रामाणिकपणा, निष्ठा याचं मी आवर्जून कौतुक केलंय.

पण, या चर्चेदरम्यान त्यांनी दिलेलं एक उत्तर माझ्या कायम लक्षात राहणार आहे. सर म्हणाले, प्रामाणिकपणा आणि निष्ठा या गोष्टी माझ्या कामाचा एक भाग आहेत... आणि मुळात हे माझ्या डीएनएमध्येच आहे. तुम्ही या गोष्टींकडे काहीतरी 'असाधारण' म्हणून पाहत असाल तर, यावरूनच प्रामाणिकपणा, निष्ठा किती दुर्मिळ झालीये हे कळून येतं. हीच अलिकडची दुर्दैवी परिस्थिती आहे..., त्यांचं हे उत्तर ऐकून माझ्याही मनात अनेक विचार आले...

## सोनम वांगचुक यांच्यावरील कारवाईचा

# काँग्रेसतर्फे तीव्र निषेध : तहसिलदारांना निवेदन

■ (प्रतिनिधी वरूड दर्पण)



**वरूड** – सामाजिक कार्यकर्ते व पर्यावरणवादी सोनम वांगचुक हे दिल्ली येथे विविध जनहिताच्या मागण्यांसाठी शांततापूर्ण उपोषण आंदोलन करत असताना त्यांच्यावर करण्यात आलेल्या सरकारी कारवाईचा निषेध व्यक्त करत तालुका काँग्रेस कमिटी व शहर काँग्रेस कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने तहसील कार्यालयात आंदोलन करण्यात आले. यावेळी तहसीलदार यांना निषेधाचे निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले की, लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक नागरिकाला संविधानाने शांततेच्या मार्गाने आंदोलन करण्याचा व आपले मत मांडण्याचा अधिकार दिला आहे. अशा परिस्थितीत जनहिताच्या प्रश्नांसाठी उपोषण करणाऱ्या सोनम वांगचुक यांच्यावर करण्यात आलेली कारवाई ही लोकशाही मूल्यांना बाधा आणणारी असून सरकारने अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घालण्याचा प्रयत्न केला आहे. ही भूमिका लोकशाहीला मारक असल्याचे काँग्रेस पक्षाने म्हटले आहे.

काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी सरकारने सोनम वांगचुक यांच्यावरील कारवाई तातडीने मागे घ्यावी, लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्यांचा सन्मान राखावा तसेच जनतेच्या प्रश्नांवर दडपशाही न करता संवादाच्या माध्यमातून तोडगा काढावा, अशी मागणी निवेदनाद्वारे केली. यावेळी तालुका काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष, वरुड शहर काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष, तालुका व शहरातील सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एका राजीनाम्यानं चालणार नाही, व्यवस्था बदलावी लागेल, सरकार बदलत नाही तोपर्यंत आयुष्य बदलणार नाही : उद्धव ठाकरे

■ (प्रतिनिधी वरूड दर्पण)



**नवी दिल्ली** – शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिल्लीत भाषण करण्यासाठी नव्हे तर युवा शक्तीला नमन करण्यासाठी आलो आहे.

स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदा पाहतोय एक सरकार जे आपल्या भविष्यावर लाठीचार्ज करतंय. तुम्ही फक्त तरुण नाही तर या देशाचे भविष्य आहात.

तुम्हाला पहिल्यांदा कॉकरोच म्हणणाऱ्या त्या महानुभावांचे आभार मानतो, असं म्हणत उद्धव ठाकरेंनी टोला लगावला. उद्धव ठाकरे म्हणाले की स्वातंत्र्यलढ्यापूर्वी तुमच्या वयाच्या क्रांतिकारकांनी बलिदान दिलं नसतं तर स्वातंत्र्य पाहायला मिळालं नसतं. काही लोक अशे होते ज्यांना इंग्रज होते त्यांना आतंकवादी मानायचे. मला असं वाटतं जे तुम्हाला आतंकवादी म्हणतात ते विदेशातून आलेत की काय, असं उद्धव ठाकरे म्हणाले. तुम्हाला काल त्यांनी अमानुषपणे मारले. काही गुंड तुमच्यावर लाठी हल्ला करत होते. एका गुंडाचा फोटो वॉंटेड म्हणून व्हायरल झाला आहे, तसाच व्हायरल करा असं उद्धव ठाकरे म्हणाले.

आज जे सत्तेत बसलेत त्यांना माहिती नाही की पुढील काळात तुमच्यापैकी अनेक लोक त्या ठिकाणी बसणार आहेत. या लोकांना कदाचित माहिती नसेल की जे येणारं भविष्य आहे ते माझ्यासमोर उभं आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले. पेपरफुटीमुळं विद्यार्थी आत्महत्या करत आहेत : उद्धव ठाकरे उद्धव ठाकरे यांनी अभिजीत दिपकेचे खास आभार मानले. अभिजीत दिपके यानं एक ठिणगी पेटवली आहे.

# मद्यपीला टोकल्याप्रकरणी विटेने हल्ला

## एक जखमी : एकाविरुध्द गुन्हा

■ (प्रतिनिधी वरूड दर्पण)



**वरुड** – यातील आरोपी नामे रोशन अरुण धोटे (३०) रा.उदापुर हा दारु पिण्याचे सवईचा आहे. फिर्यादी नामे नंदकिशोर धोटे (३०) हे शेतातुन घरी परत येत असता आरोपी रोशन हा नंदकिशोरचे घरासमोर रस्स्त्यावर झोपलेला दिसला तर नंदकिशोरने आरोपी नंदकिशोरला म्हटले की, 'तु येथे कशाला झोपला, घरात जावुन झोप' तर रोशनने काहीही ऐकुन न घेता नंदकिशोरला शिवीगाळ केली व रस्त्यावर पडलेली विट हातात घेवुन फेकली. ती नंदकिशोरला लागली व आरोपीने नंदकिशोरला पुन्हा शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणी नंदकिशोर धोटे (४५) यांचे फिर्यादीवरुन वरुड पोलिसांनी रोशन अरुण धोटे (३०) याचे विरुध्द कलम १२५, ३५२, ३५१ (२) अन्वये गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास सुरु आहे.

## न्यू इंग्लिश प्रायमरी स्कूल येथे

# पालक-शिक्षक सभेचे यशस्वी आयोजन

■ (प्रतिनीधी वरूड दर्पण)



**वरूड** – न्यू इंग्लिश प्रायमरी स्कूल येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील पहिली पालक-शिक्षक सभा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

सभेचे आयोजन मुख्याध्यापिका कोमल पांडव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

या सभेला इयत्ता पहिलीपासून पुढील सर्व वर्गांच्या विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेमध्ये विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, परीक्षेचा नमुना, विद्यार्थ्यांची नोंदणी, शिस्त, शालेय फी, पालक-शिक्षक संघ स्थापना तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

मुख्याध्यापिका कोमल पांडव यांनी पालकांना विद्यार्थ्यांच्या शिक्षणात पालकांचा सक्रिय सहभाग किती महत्त्वाचा आहे, याविषयी मार्गदर्शन केले तसेच शाळा व पालक यांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, सामाजिक व नैतिक विकास अधिक प्रभावीपणे साध्य होऊ शकतो, असे त्यांनी सांगितले.

सभेदरम्यान पालकांनीही आपल्या सूचना व मते मांडली. शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रगतीची माहिती पालकांना देऊन आवश्यक मार्गदर्शन केले.पालकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे ही पालक-शिक्षक सभा अत्यंत यशस्वी ठरली.

# 'स्वत:चे ध्येय ठरवा अन्यथा दुसऱ्यांच्या ध्येयपूर्तीचे साधन बनाल'

■ (प्रतिनिधी वरूड दर्पण)

'स्वत:चे ध्येय ठरवा अन्यथा दुसऱ्यांच्या ध्येयपूर्तीचे साधन बनाल'




**वरुड** – युवकांनी आयुष्यात स्वतःचे ध्येय वेळेत निश्चित करणे अत्यंत गरजेचे आहे जर तुम्ही स्वतःची उद्दिष्टे स्वतः ठरवली नाहीत, तर आयुष्यभर तुम्हाला दुसऱ्यांची ध्येये पूर्ण करण्यासाठी एक साधन म्हणुन काम करावे लागेल, असे परखड मत प्रसिद्ध प्रशिक्षक हिमांशु पजारे यांनी व्यक्त केले.

महिंद्रा प्राईड क्लासरुम आणि नांदी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या ७ दिवसीय विशेष प्रशिक्षण शिबिराच्या प्रसंगी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणुन बोलत होते.

स्थानिक स्व.शिवरामजी हिवसे अध्यापक महाविद्यालयात आयोजित या शिबिराचे उदघाटन आणि नियोजन संचालिका डॉ.प्राची ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते तर अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा.किशोर तडस होते.

आजच्या स्पर्धेच्या युगात केवळ पदवी मिळवणे पुरेसे नसून विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक कौशल्ये असणे काळाची गरज बनली आहे. हाच उद्देश डोळ्यांसमोर ठेवून बीएड द्वितीय वर्षाच्या प्रशिक्षणार्थ्यांसाठी या ७ दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या सात दिवसांच्या प्रदीर्घ आणि अभ्यासपूर्ण शिबिरात प्रशिक्षक हिमांशु पझारे यांनी विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख आणि व्यक्तिमत्त्व विकासाशी संबंधित अनेक महत्त्वाच्या पैलूंवर सखोल मार्गदर्शन केले.

याशिवाय प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात काम करताना येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी प्रॉब्लेम सॉल्व्हिंग, क्रिटिकल थिंकिंग, कॉन्फ्लिक्ट मॅनेजमेंट, टाईम मॅनेजमेंट आणि वर्कप्लेस एथिक्स या विषयांवरही विस्तृत चर्चा करण्यात आली.

विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी आणि त्यांना भविष्यातील नोकरीच्या संधींसाठी तयार करण्यासाठी शिबिरादरम्यान रिज्युम प्रिपरेशन आणि प्रत्यक्ष इंटरव्यू प्रॅक्टिस करुन घेण्यात आल्या.

# शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याचा विषय सरकार गंभीरतेनं घेत नाही

## उद्धव ठाकरेंचा नवा प्लॅन, राहुल गांधींशी चर्चा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राजधानी दिल्लीत नीट पेपरफुटीवरुन सुरू असलेल्या आंदोलनात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी थेट सहभाग घेत आंदोलकांना बळ दिलंय. कॉक्रोच जनता पक्षाच्या अभिजीत दीपके यांच्याशी उद्धव ठाकरे सातत्याने संपर्कात होते. तसेच, सोनम वांगचूक यांनी आपलं उपोषण मागे घ्यावं, अशी विनंती देखील त्यांनी वांगचुक यांच्या प्रकृतीची काळजी व्यक्त करत केली होती. त्यानंतर, विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर पोलिसांकडून झालेल्या लाठीचार्जनंतर आता उद्धव



ठाकरे दिल्लीत पोहोचले आहेत. दिल्लीतील जंतरमंतर मैदानावर त्यांनी आंदोलकांची भेट घेतली. त्यानंतर, ते सर्वच विरोधकांनी आंदोलकांच्या पाठीशी उभं राहिलं पाहिजे, अशी भूमिका घेत आहेत.

एकीकडे अभिजीत दीपकेंचं आंदोलन तीव्र होत असताना, दुसरीकडे काँग्रेसही आक्रमक बनली असून राहुल गांधींच्या नेतृत्वात थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या घराबाहेर खासदारांनी आपला रोष व्यक्त केला. विशेष म्हणजे दिल्ली पोलिसांनी संसदेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधींनाही ताब्यात घेतलं होतं. त्याच दिवशी उद्धव ठाकरेंनी दिल्लीत जाऊन आंदोलकांची भेट घेतली. 'केंद्र सरकार ज्या बेरहमीने आणि असभ्यपणाने आंदोलक तरुण आणि महिलांवर अत्याचार करत आहे, हे कोणत्याही लोकशाहीचे लक्षण नाही. आज देशात जो आक्रोश दिसतोय, तो अचानक आलेला नाही; तर हा गेल्या १२ वर्षात साठलेला असंतोष आता उफाळून बाहेर पडतोय,' अशा शब्दांत उद्धव ठाकरेंनी मोदी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. तसेच, सरकार दखल घेत नसल्याने आता आंदोलनाचे स्वरुप बदलण्याचेही त्यांनी म्हटलं.

# 'जयंती म्हणून मानताना मन तुटून जातंय...' : अजित दादांच्या आठवणीत सुनेत्रा पवारांची भावनिक पोस्ट

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**बारामती** – राज्याचे दिवंगत नेते अजित पवार यांची आज (दि.२२) जयंती आहे. २८ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या दुर्दैवी विमान अपघातात त्यांचे निधन झाले होते. त्यांच्या अकाली जाण्याने केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर संपूर्ण देश हळहळला होता.



जयंतीनिमित्त उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सोशल मीडियावर भावनिक पोस्ट शेअर करत त्यांना श्रद्धांजली वाहिली. अनेक वर्षे आनंदात आणि उत्साहात साजरा होणारा वाढदिवस आता जयंती म्हणून साजरा करताना मन तुटून जात असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. अजित पवार यांच्या आठवणी, त्यांचे विचार, लोकसेवेची तळमळ आणि त्यांनी दिलेले प्रेम आयुष्यभर सोबत राहील, अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

**सुनेत्रा पवार यांची पोस्ट जशीच्या तशी**

दादा... एवढी वर्ष तुमचा जन्मदिवस मी अगदी आनंदाने, उत्साहाने आणि अभिमानाने साजरा केला... घर, कुटुंब आनंदात असायचं, शुभेच्छांचा वर्षाव असायचा.. पण आज तुमचा हाच दिवस 'जयंती' म्हणून मानताना माझं मन आतून पार तुटून जातंय. हे कटू सत्य स्वीकारायला माझं मन आजही अजिबात तयार होत नाही दादा...

आयुष्याच्या प्रत्येक वळणावर तुम्ही माझी सर्वात मोठी ताकद बनून सोबत राहिलात. तुमचा तो भक्कम आधार, कठीण प्रसंगात पाठीवर पडणारी तुमची विश्वासू थाप आणि मला दिलेली साथ... आज हे सगळं अचानक हरवून गेलंय, सगळं सगळं पोरकं झालंय यावर विश्वासच बसत नाही. काळाने माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा आधार एवढ्या लवकर हिरावून नेईल, असं स्वप्नातही वाटलं नव्हतं आज तुमचा हा दिवस साजरा करताना काळीज पिळवटून निघतंय, डोळ्यांतील अश्रू थांबायचं नाव घेत नाहीत. दादा, तुम्ही भलेही आज माझ्यासोबत शारीरिकदृष्ट्या नसलात, तरी तुमचे विचार, तुमच्या आठवणी, तुमचा लोकांप्रती सेवाभाव, शिस्त आणि तुम्ही दिलेलं प्रेम माझ्या प्रत्येक श्वासात, कणाकणात कायम जिवंत राहील... माझ्या आयुष्याच्या साथीदाराला, तुमच्या पवित्र आठवणींना भावपूर्ण आणि आदरपूर्वक प्रणाम...!

**स्मारकस्थळी कुटुंबीयांकडून अभिवादन**

जयंतीनिमित्त बारामतीतील स्मारकस्थळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार, जय पवार आणि पवार कुटुंबातील सदस्यांनी पुष्पचक्र अर्पण करून अजित पवार यांना अभिवादन केले. यावेळी त्यांच्या लोकसेवा, विकासकामे आणि सामाजिक योगदानाचे स्मरण करण्यात आले.

**समर्थकांकडूनही श्रद्धांजली**

सुनेत्रा पवार यांची ही भावनिक पोस्ट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली. अनेक समर्थक, कार्यकर्ते आणि नागरिकांनी अजित पवारांना श्रद्धांजली अर्पण करत सुनेत्रा पवार आणि त्यांच्या कुटुंबीयांना धीर दिला.

# कॉमनवेल्थ गेम्ससाठी भारतीय संघाची यादी जाहीर!

प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – यंदा कॉमनवेल्थ गेम्स २०२६ संक्षिप्तपणे खेळली जाणार आहे. भारताने १२६ सदस्यीयांची यादी जाहीर केली आहे. यात ॲथलेटिक्स, बॉक्सिंग, ज्युडो, वेटलिफ्टिंगसह पॅरा ॲथलेटिक्स, पॅरा जलतरण, पॅरा ट्रॅक सायकलिंग आणि पॅरा पॉवरलिफ्टिंग अशा एकूण नऊ क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होणार आहे.




यंदाच्या कॉमनवेल्थ गेम्स स्पर्धेतून अनेक खेळ कमी करण्यात आल्याने भारताच्या पदकसंख्येला याचा मोठा फटका लागणार आहे. यंदा १९ पैकी १० खेळांचा समावेश करण्यात आला आहे. तर खेळाडूंच्या संख्यामध्ये मोठे असलेले खेळ यावेळी वगळण्यात आले आहेत. यात क्रिकेट, हॉकी, बॅडमिंटन, कुस्ती, स्क्वॉश, टेटे, डायव्हिंग, रग्बी, नेमबाजी हे खेळ आहेत. हे मोठे खेळ कमी झाल्याने भारताचे ५-६ खेळांमधील पदक कमी झाले आहेत.यंदाच्या संघात दोन वेळा ऑलिम्पिक पदकविजेता नीरज चोप्रा, ऑलिम्पिक कांस्यपदक विजेती बॉक्सर लव्हलिना बोर्गोहेन आणि टोकियो ऑलिम्पिकची रौप्यपदक विजेती मीराबाई चानू यांच्यासारखे स्टार खेळाडू संघाचे नेतृत्व करणार आहेत. स्पर्धेसाठी ॲथलेटिक्समध्ये सर्वाधिक ३२ खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. त्यानंतर बॉक्सिंग आणि ज्युडो या दोन्ही प्रकारांमध्ये प्रत्येकी १४ खेळाडूंना संधी मिळाली आहे, तर वेटलिफ्टिंगसाठी १२ सदस्यीय संघ निवडण्यात आला आहे.

**वकील सर्वोच्च न्यायालयात : 'जंतर-मंतरवर आंदोलन सुरुय, पोलीस अत्यंत अमानुष कारवाई करत आहेत'**

# सरन्यायाधीश : 'आमचा वेळ वाया घालवू नका, आम्हाला व्हिडिओंमध्ये अजिबात रस नाही, पाहायला वेळ नाही'

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – सुप्रीम कोर्टाने छएएढ पेपर फुटीच्या कथित प्रकरणावरून दिल्लीत सुरू असलेल्या आंदोलनाचा मुद्दा कोर्टात उपस्थित करण्याचा एका वकिलाचा प्रयत्न फेटाळून लावला. भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी संबंधित वकिलाला कोर्टाचा वेळ वाया न घालवण्यास सांगितले आणि आंदोलनाचे व्हिडिओ पाहण्यास स्पष्ट नकार दिला. सरन्यायाधीश




सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर वकील म्हणाले, जंतर-मंतरवर आधीच आंदोलन सुरू आहे. पोलीस अत्यंत अमानुष कारवाई करत आहेत. त्यांनी असाही दावा केला की आंदोलकांवर अश्रूधुराचा वापर करण्यात आला आहे. यावर सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणाले, आमचा आणि तुमचा वेळ वाया घालवू नका. तुमचा वेळ आमच्यापेक्षा जास्त मौल्यवान आहे.


आम्हाला व्हिडिओंमध्ये अजिबात रस नाही तरीही वकिलांनी आपले म्हणणे मांडणे सुरूच ठेवले. ते म्हणाले, ङ्गविद्यार्थ्यांच्या तीन अत्यंत महत्त्वाच्या मागण्या आहेत, की सरकारने नीट परीक्षा पूर्णपणे पारदर्शक आणि खुल्या वातावरणात घेतली पाहिजे तसेच (नॅशनल टेस्टिंग एजन्सी) संस्था बरखास्त केली पाहिजे. खंडपीठात न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांचाही समावेश होता. जेव्हा खंडपीठाने या विषयावर पुढे ऐकण्यास अनिच्छा दर्शवली, तेव्हा वकिलाने सांगितले की त्यांच्याकडे व्हिडिओंचा संग्रह आहे आणि परवानगी दिल्यास ते ते दाखवू शकतात. यावर सरन्यायाधीश म्हणाले, आम्हाला व्हिडिओंमध्ये अजिबात रस नाही. आमच्याकडे ते पाहायला वेळ नाही. विशेष म्हणजे, याच वर्षाच्या सुरुवातीला सरन्यायाधीशांनी एका टिप्पणीत बेरोजगार तरुणांची तुलना 'झुरळांशी' केल्याचे समोर आले होते. त्यांच्या याच वक्तव्यानंतर 'कॉकरोच जनता पार्टी'ची स्थापना झाली, जी सध्या दिल्लीतील जंतर-मंतर येथील या आंदोलनाचा मुख्य चेहरा आहे. दिल्ली उच्च न्यायालयात आज सुनावणी दरम्यान, दिल्ली उच्च न्यायालय सोनम वांगचुक यांनी जंतर मंतर येथील अनिश्चितकालीन उपोषणादरम्यान झालेल्या पोलीस कारवाईविरोधात दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी घेणार आहे.

मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती तेजस कारिया यांचे खंडपीठ या प्रकरणाची सुनावणी करेल.

# खासदार विलीनीकरण प्रकरणात लोकसभा अध्यक्षांसह ६ बंडखोरांना नोटीस

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – उबाठा गटाच्या ६ खासदारांच्या शिवसेनेतील विलीनीकरणाला लोकसभा अध्यक्षांनी नुकतीच मंजुरी दिली होती. या निर्णयाविरोधात उबाठा गटाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर प्राथमिक सुनावणी घेत न्यायालयाने लोकसभा अध्यक्ष, लोकसभा सचिवालयाचे सचिव आणि संबंधित ६ खासदारांना नोटीस बजावली आहे. सर्वोच्च न्यायालयाने सर्व प्रतिवादींना उत्तर देण्यासाठी दोन आठवड्यांचा वेळ दिला असून, त्यानंतर पुढील सुनावणी होणार आहे.



लोकसभा निवडणुकीत उबाठा गटाचे ९ खासदार निवडून आले होते. त्यापैकी दोन-तृतीयांश म्हणजेच ६ खासदारांनी स्वतंत्र गट स्थापन करून शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. या विलीनीकरणाला लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी अधिकृत मान्यता दिल्यानंतर लोकसभेत शिवसेनेचे संख्याबळ १३ वर पोहोचले, तर उबाठा गटाकडे ३ खासदार उरले. या निर्णयाला उबाठा गटाने राज्यघटनेच्या १० व्या अनुसूचीतील तरतुदींचा हवाला देत सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. मूळ पक्षाचे विलीनीकरण झालेले नसताना, खासदारांच्या गटाचे विलीनीकरण कायदेशीर चौकटीत बसत नाही, असा उबाठा गटाचा दावा आहे. तर, २/३ पेक्षा जास्त लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन घेतलेला हा निर्णय घटनात्मक तरतुदींनुसारच असल्याचे शिवसेनेचे आणि सत्ताधारी पक्षाचे म्हणणे आहे. त्यामुळे दोन आठवड्यांत येणाऱ्या उत्तरांनंतर सर्वोच्च न्यायालय या विलीनीकरणाच्या वैधतेबाबत काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण देशाचे आणि महाराष्ट्राच्या राजकीय वतुर्ळाचे लक्ष लागले आहे.

# अजितदादांच्या आठवणींनी भावुक झाले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## 'एका डोळ्यात आनंद, दुसऱ्या डोळ्यात अश्रू...': दादांच्या जयंतीनिमित्त उपमुख्यमंत्री शिंदेंची भावनिक आदरांजली

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांना अत्यंत भावनिक शब्दांत आदरांजली वाहिली आहे.

२२ जुलै हा दिवस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचा आनंद आणि महायुतीचे प्रमुख नेते अजितदादा पवार यांच्या आठवणींचे दुःख असा संमिश्र भावनांनी भरलेला दिवस असल्याचे शिंदे यांनी सांगितले. एका डोळ्यात



आनंद आणि दुसऱ्या डोळ्यात अश्रू घेऊन आजचा दिवस आला आहे, अशा शब्दांत एकनाथ शिंदे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

अजितदादांची जागा कोणीही भरून काढू शकत नाही, परंतु त्यांनी दाखविलेल्या विकासाच्या मार्गावर चालून सुखी आणि समृद्ध महाराष्ट्र घडवण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना बळ मिळो, अशी प्रार्थना त्यांनी केली.

अजितदादांच्या कार्यशैलीचे स्मरण करताना शिंदे म्हणाले की, कार्यकर्त्यांशी जिव्हाळ्याचे नाते, वक्तशीरपणा, दिवसातील प्रत्येक क्षण जनतेसाठी खर्च करणे आणि प्रशासनावर प्रभावी पकड ठेवणे याचे धडे दादांनी संपूर्ण राजकीय पिढीला दिले. अर्थमंत्री म्हणून त्यांनी मांडलेला अर्थसंकल्प, शेती, शेतकरी आणि सहकार क्षेत्रा-वरील त्यांचा सखोल अभ्यास महाराष्ट्रासाठी नेहमीच प्रेरणादायी राहील, असेही त्यांनी नमूद केले. महाराष्ट्राच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीची अनेक स्वप्ने आम्ही सोबत पाहिली होती, परंतु नियतीने दादांना आपल्यातून अकाली हिरावून नेले. त्यामुळे त्यांनी पाहिलेली विकासाची स्वप्ने पूर्ण करणे हीच त्यांच्याप्रती खरी आदरांजली ठरेल.

महायुतीमधील सहकार्य आणि विकासाची दृष्टी कायम ठेवत एकनाथ शिंदे यांनी अजितदादा पवार यांच्या कार्याला कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले.




# धावत्या शिवशाही बसला भीषण आग : चालकाच्या प्रसंगावधानामुळे वाचले ५० हून अधिक प्रवाशांचे प्राण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**धुळे** – शहराजवळील नगाव बारी परिसरात नंदुरबारहून धुळ्याकडे येणाऱ्या शिवशाही बसला बुधवारी अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली.

बसमधून धुराचे लोट निघताच चालकाने प्रसंगावधान दाखवत बस तात्काळ रस्त्याच्या कडेला थांबवली आणि सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे खाली उतरवले. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली. मिळालेल्या माहितीनुसार, नंदुरबारहून धुळ्याकडे येणारी शिवशाही बस नगाव बारी परिसरात पोहोचली असताना अचानक बसच्या इंजिनाच्या भागातून धूर येऊ लागला. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण करत संपूर्ण बसला वेढा घातला. आग पाहताच बसमधील प्रवाशांमध्ये एकच घबराट पसरली. मात्र, चालकाने धीर न सोडता तातडीने बस थांबवून सर्व प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढले.

चालकाच्या सतर्कतेमुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळली आणि कोणतीही जीवितहानी झाली नाही. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. मात्र, तोपर्यंत आगीने बसचा मोठा भाग जळून खाक झाला होता. प्राथमिक माहितीनुसार, बसला शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

# बसस्थानक परिसरातील अवैध वाहतुकीला चाप : २० दिवसांत ८ हजार ८३९ वाहनांवर कारवाई, १ कोटी ६५ लाखांचा दंड वसूल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – राज्यातील एसटी बसस्थानक परिसर अवैध वाहतूक मुक्त करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, पोलीस विभाग आणि प्रादेशिक परिवहन विभाग (आरटीओ) यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष अंमलबजावणी मोहीम राबविण्यात आली. १ ते २० जुलै या अवघ्या २० दिवसांच्या कालावधीत राबवण्यात आलेल्या या विशेष मोहिमेदरम्यान राज्यभरात एकूण ८ हजार ८३९ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. विविध यंत्रणांच्या संयुक्त कारवाईतून १ कोटी ६५ लाख २१ हजार ३१५ रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असून, नियमांचे उल्लंघन करणारी १९५ वाहने जप्त करण्यात आली आहेत. मात्र, बसस्थानक परिसरात होणाऱ्या अवैध वाहतुकीमुळे वाहतूककोंडी, अनिर्बंध वाहतूकीमुळे प्रवाशांच्या सुरक्षितते बरोबरच मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत होते. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही बाब गंभीर होती. याच पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी संयुक्त कारवाईचे स्पष्ट निर्देश दिले होते.

# इकडं पश्चिम बंगालमधील तब्बल २ हजार सीआरपीएफ जवान थेट दिल्लीला एअरलिफ्ट

## गृह मंत्रायलाचा आदेश अन तिकडं जंतर मंतर सोडणार नसल्याचा कॉकरोच जनता पार्टीचा एल्गार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***नवी दिल्ली*** – दिल्लीतील जंतर मंतर येथे सीजेपीच्या आंदोलनाचा आज ३३ वा दिवस आहे. बुधवार सकाळपासून हजारो आंदोलक जंतर मंतर येथे जमले आहेत. यामध्ये २० जुलै रोजीच्या संसद मोर्चादरम्यान ज्यांच्यावर पोलिसांनी लाठीचार्ज आणि अश्रुधुराच्या नळकांड्या फेकल्या होत्या, त्यांचाही समावेश होता. दरम्यान, २० जुलै रोजी सीजेपीच्या संसद मोर्चादरम्यान झालेल्या हिंसाचाराप्रकरणी दिल्ली पोलिसांनी १० एफआयआर नोंदवले आहेत. यामध्ये पार्लमेंट मार्ग पोलीस ठाण्यात चार, कनॉट प्लेसमध्ये तीन आणि मंदिर मार्ग, बाराखंबा रोड व कर्तव्य पथ पोलीस ठाण्यात प्रत्येकी एका एफआयआरचा समावेश आहे. आंदोलकांवर आरएएफ जवानांच्या हत्येचा प्रयत्न, दगडफेक, तोडफोड आणि सरकारी कामात अडथळा आणल्याचा आरोप आहे. दुसरीकडे, कॉकरोच जनता पार्टी'चे प्रवक्ते आशुतोष रांका म्हणाले की, जोपर्यंत केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान राजीनामा देत नाहीत, तोपर्यंत ते जंतर मंतर सोडणार नाहीत.


# ठाण्यातील अग्निसुरक्षा धाब्यावर : शहरातील आकडेवारीने प्रशासनाची झोप उडाली

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**ठाणे** - गावदेवी भाजी मंडईतील भीषण आगीत दोन जणांचा बळी गेल्यानंतर शहरातील अग्निसुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असतानाच ठाणे महापालिकेच्या महासभेत समोर आलेल्या आकडेवारीने प्रशासनाची झोप उडवणारी वस्तुस्थिती उघड केली. प्रश्नोत्तराच्या तासात भाजपच्या नगरसेविका मृणाल पेंडसे यांनी शहरातील तेलाच्या गोडाऊनांची संख्या, त्यांची कायदेशीर स्थिती आणि अग्निशमन विभागाच्या वापर परवान्याबाबत प्रश्न उपस्थित केला. त्यावर प्रशासनाने दिलेल्या उत्तराने सभागृहात एकच खळबळ उडाली.

# केतनला अपंग करण्याचा सियाचा कट उघडकीस

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***पुणे*** – पुण्याच्या केतन अग्रवाल हत्या प्रकरणात पोलीस तपासातून अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली असून आरोपींनी केतनला ठार मारण्यापूर्वी त्याला आयुष्यभरासाठी अपंग बनवण्याचा कट रचला होता. या प्रकरणातील मुख्य आरोपी सिया गोयल आणि तिचा साथीदार चेतन चौधरी यांनी ६ जून रोजी होणारी बाली ट्रिप आणि त्यानंतर होणारे लग्न टाळण्यासाठी हा भयंकर कट रचल्याचे तपासात समोर आले आहे.

सुरुवातीला केतनचा खून करण्याची त्यांची योजना नव्हती, तर एका बनावट अपघाताच्या माध्यमातून किंवा लुटीचा बनाव रचून केतनचे हात किंवा पाय कायमचे निकामी करण्याचा त्यांचा विचार होता. केतनला अपंगत्व आले तर कुटुंबीयांना लग्न मोडण्यासाठी तयार करणे सोपे जाईल, असा सियाचा विश्वास होता.




# स्वच्छतेच्या मुद्द्यावर महापालिका ॲक्शन मोडवर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – मुंबईतील दैनंदिन स्वच्छता व्यवस्था अधिक परिणामकारक, शिस्तबद्ध आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने राबविण्यात यावी. त्यासाठी सर्व प्रशासकीय विभागांच्या सहायक आयुक्तांनी दररोज सकाळी स्वच्छता चौक्यांना प्रत्यक्ष भेट देऊन स्वच्छता कामांचा आढावा घ्यावा. रस्ते, पदपथ, सार्वजनिक ठिकाणे तसेच परिसराची नियमित आणि वेळेवर स्वच्छता होत असल्याची खातरजमा करावी. मुंबईत कोणत्याही ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचणार नाहीत, यासाठी प्रभावी नियोजन, सातत्यपूर्ण देखरेख आणि तातडीची कार्यवाही सुनिश्चित करावी, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त डॉ.विपिन शर्मा यांनी दिले. तसेच कामकाजात कुचराई करणा–या अधिका–यांवर कारवाई करा, असेही निर्देश डॉ.शर्मा यांनी देत महापालिका प्रशासन ॲक्शन मोडवर असल्याचे दाखवून दिले. मुंबईतील 'दृश्यमान स्वच्छते' विषयक आढावा बैठक अतिरिक्त आयुक्त डॉ.विपिन शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार २१ जुलै २०२६ रोजी पार पडली.

